# राज्यसेवा / सरळसेवा / आरोग्य विभाग

स्पर्धा परीक्षा

# चालू घडामोडी

( Special - Group B & C )

## जुलै - २०२५ ( मासिक )

### महत्वाचे मुद्दे

- पुरस्कार
- विधेयक
- महत्वाच्या नियुक्त्या
- पोर्टल
- योजना सारांश
- महत्वाचे वन लाईनर
- महाराष्ट्र विशेष
- खेळ














## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

संचालक - सुरेश नारायण कुंभार

@mpscshorts +917720039454 www.mpscshort.in





# चालू घडामोडी – जुलै ( मासिक )

- जागतिक ॲथलेटिक्सने जाहीर केलेल्या ताज्या क्रमवारीत जगातील नंबर एकचा भालाफेकपटू नीरज चोप्रा ठरला आहे. (नीरज चोप्रा 1445 गुणसंख्यासह जगातील एक नंबरचा भालाफेकपटू ठरला आहे.)
- महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिव पदी राजेश कुमार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
- भारतातील सर्वात लांब प्राणी ओव्हरपास कॉरिडॉर दिल्ली-मुंबई महामार्ग यावर बांधण्या त आले आहे.



- हॉकी इंडिया मास्टर्स कप 2025 स्पर्धेचा पुरुष विजेता संघ - तमिळनाडू.
- हॉकी इंडिया मास्टर्स कप 2025 स्पर्धेचा महीला विजेता संघ - ओडिशा.

- नुकतेच घाना देशाने "द ऑफिसर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार ऑफ घाना" या सर्वोच्च पुरस्काराचे नरेंद्र मोदी यांना सन्मानीत केले आहे. (नरेंद्र मोदी यांना आतापर्यंत 24 आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.)
- भारताचे पहिले ग्रीन डेटा सेंटर गाझियाबाद या ठिकाणी स्थापन करण्यात आले आहे.
- कांगो आणि रवांडा या दोन देशात वाशिंग्टन डीसी या ठिकाणी शांतता करार झाला आहे.
- FIH Women's Pro लीग २०२५ चे आयोजन जर्मनी येथे करण्यात आले होते. ( FIH Women's Pro लीग २०२५ मध्ये नेदरलँड संघाने प्रथम स्थान पटकावले आहे.)
- यूएस ओपन सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेचे विजेतेपद आयुष शेट्टी यांनी पटकावले आहे.

- इस्रोचे माजी वरिष्ठ शास्त्रज्ञ विजय पेंडसे
  इस्रोचे (ISRO) माजी वरिष्ठ शास्त्रज्ञ विजय पेंडसे यांचे नुकतेच निधन झाले.
  ते ८० वर्षांचे होते त्यांनी अमेरिकेमध्ये अखेरचा श्वास घेतला ते दीर्घ आजारानं त्रस्त होते,
  सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विद्यार्थी होते त्यांनी रसायनशास्त्रात शिक्षण घेतले होते.



- देशाचे पहिले अंध आयर्नमॅन किताब पटकावणारे व्यक्ती
  श्रीनिवास दलाल ज्यांचे नुकतेच निधन झाले. ते 43 वर्षांचे होते.
  हॉटेलच्या दुसऱ्या मजल्यावरून पडून त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.



- राष्ट्रीय सार्वजनिक सहकार्य व बालविकास संस्थाचे नाव बदलून आता सावित्रीबाई फुले राष्ट्रीय महिला व बालविकास संस्था असे ठेवण्यात आले आहे. ( राष्ट्रीय सार्वजनिक सहकार्य व बालविकास संस्थेची (NIPCCD) स्थापना 28 फेब्रुवारी 1966 रोजी झाली होती.)



**मुख्यमंत्री प्रतिज्ञा योजना बिहार राज्याने सुरू केली आहे.**

मुख्यमंत्री प्रतिज्ञा योजना २०२५ ही बिहारमधील १८ ते २८ वयोगटातील तरुणांसाठी सुरू केलेली योजना आहे. या योजनेअंतर्गत, पात्र तरुण प्रसिद्ध कंपन्यांमध्ये इंटर्नशिप करू शकतात आणि त्यांच्या शिक्षणाच्या पातळीनुसार त्यांना मासिक ४,००० ते ६,००० रुपये भत्ता मिळू शकतो. जर इंटर्नशिप त्यांच्या गृह जिल्ह्याच्या किंवा राज्याबाहेर असेल तर त्यांना प्रवास किंवा राहण्याचा भत्ता म्हणून अतिरिक्त पैसे देखील मिळतील. या योजनेचा उद्देश तरुणांना कामाचा अनुभव आणि आर्थिक आधार देणे आहे.

- आशिया चषक हॉकी २०२५ चे आयोजन बिहार राज्यात २९ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या कालावधीत करण्यात येणार आहे.
- प्रयोगशाळेत मानवी DNA बनवण्याचा प्रयोग प्रथमच इंग्लंड देशात होत आहे.
- सुरिनाम WHO द्वारा मलेरिया मुक्त प्रमाणपत्र भेटणारा ४६ वा देश ठरला आहे.



- कर्नाटक मंत्रिमंडळाने "बेंगळुरू सिटी युनिव्हर्सिटीचे" नाव माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग नांच्या नावावर बदलण्यास मान्यता दिली आहे.
- अमित शहा यांच्या हस्ते राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या आवारात "थोरले बाजीराव पेशवे" यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण करण्यात आले.
- इलॉन मस्क यांनी अमेरिकेत "अमेरीका पार्टी" या नवीन पक्षाची स्थापना केली.
- भारतीय नौसेनाची पहिली महिला फायटर आस्था पुनिया बनली आहे.
- खो खो फेडरेशन ऑफ इंडिया च्या अध्यक्षपदी सुधांशू मित्तल यांची निवड झाली आहे.
- Quad २०२५ ची बैठक भारत देशात होणार आहे.
- जागतीक स्तरावर उत्पन्न समानतेत भारत चौथ्या क्रमांकावर आहे.
- भारतातील सर्वात वयस्कर स्कायडाईव्ह करणाऱ्या महिला डॉ. श्रद्धा चौहान आहेत.



- भारतातील पहिला डिजिटल घराचा पत्ता (Digital House Address) प्रकल्प इनदूर महानगरपालिकेने सुरू केला.
- कसोटी क्रिकेट मध्ये दोन्ही डावात शतक झळकावणारा शुभमन गिल तिसरा भारतीय कर्णधार ठरला आहे.
- १९ वर्षाखालील वनडे क्रिकेट स्पर्धेत सर्वात कमी चेंडूत शतक झळकावणारा फलंदाज वैभव सूर्यवंशी
- ठरला आहे.
- देशातील पहिले राष्ट्रीय सहकार विद्यापीठाचे भूमिपूजन गुजरात राज्यात झाले आहे. ( पहिल्या राष्ट्रीय सहकार विद्यापीठाला त्रिभुवनदास किशीभाई पटेल यांचे नाव देण्यात आले आहे.)
- भारताचे पहिले ट्रान्सगेंड क्लिनिक हैद्राबाद येथे टाटा समूह मदतीने सुरू करण्यात आले आहे.
- २०२५-२७ वर्षाच्या कॉमनवेल्थ युथ पीस ॲम्बेसेडर म्हणुन सुकन्या सोनोवाल यांची निवड झाली आहे.
- १७ वी ब्रिक्स शिखर परिषद ब्राझील  येथे होत आहे. ( ब्रिक्स शिखर परिषद २०२६ चे आयोजन भारत देशात होणार आहे.)

---

- महाराष्ट्र सरकारने मुंबईतील ५१ कबुतरखान्यावर बंदी घातली आहे.
- १७व्या ब्रिक्स शिखर परिषदेपूर्वी कोलंबिया आणि उझबेकीस्तान हे दोन देश अधिकृतपणे न्यू डेव्हलपमेंट बँकेत शामील झाले आहेत.
- गर्शिनिया कुसुमाई फुलांसाठी प्रसिद्ध असलेल्या झाडाची नवीन प्रजातीचा शोध आसाम राज्यात लागला आहे.
- सुरिनाम देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती म्हणून जेनिफर सायमन्स यांची निवड झाली आहे.
- FIDE women's World cup २०२५ का आयोजन जॉर्जिया येथे करण्यात येणार आहे.

- **मुख्यमंत्री वृंदावन ग्राम योजना.**

मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्या नेतृत्वाखालील मध्य प्रदेश मंत्रिमंडळाने 'मुख्यमंत्री वृंदावन ग्राम योजना' मंजूर केली आहे. किमान 2,000 लोकसंख्या आणि 500 गोवंश असलेली गावे वृंदावन ग्राम म्हणून विकसित केली जातील. या योजनेत गोपालन, सेंद्रिय शेती, सौर ऊर्जा, जलसंधारण आणि ग्रामीण उद्योजकतेला प्रोत्साहन दिले जाईल.



- अलिकडेच जन सुरक्षा संतुष्टी अभियान गुजरात राज्याने सुरू केले आहे.
- ICC चे नवे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) संजोग गुप्ता बनले आहेत.
- नुकतेच गिरीश गांधी सामाजिक पुरस्काराने हेरंब कुलकर्णी, प्रतिभा कुलकर्णी यांना सन्मानित करण्यात आले.

---

- **ब्रिक्स शिखर परिषद २०२६ चे आयोजन भारत देशात होणार आहे.**

ब्रिक्स (इंग्लिश: BRICS) हे भारत, ब्राझिल, रशिया, चीन आणि दक्षिण आफ्रिका या देशांच्या शिखर संघटनेचे संक्षिप्त नाव आहे. सुरुवातीला फक्त चार देश या संघटनेचे सदस्य होते आणि "ब्रिक" या संक्षिप्त नावाने ओळखले जात होते. २०१० मध्ये दक्षिण आफ्रिका समाविष्ट झाल्यावर संघटनेचे नाव ब्रिक्स झाले.




- स्लाइस (Slice) या फिनटेक कंपनीने भारतातील पहिली UPI-चालित बँक शाखा बंगळूरु येथे सुरू केली आहे.
- ऑर्गनायझेशन ऑफ द प्रोहिबेशन ऑफ रासायनिक शस्त्रेची आशियाई क्षेत्रीय बैठक नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आली आहे.
- आशियाई पॅरा तिरंदाजी चॅम्पियनशीप २०२५ मध्ये भारताने ९पदके जिंकली आहेत.(३-सुवर्ण)
- वितरण आधारावर आधारित ओळख प्रणाली सुरू करणारे भारतातील पहिले राज्य हिमाचल प्रदेश
- ठरले आहे.
- सर्वपल्ली राधाकृष्णन विद्यार्थी मित्र किड्स योजना आंध्र प्रदेश राज्यामध्ये सुरू करण्यात आली.
- मायक्रोसॉफ्टने अलिकडेच पाकिस्तान देशात आपला व्यवसाय पूर्णपणे बंद केला आहे.
- अलिकडेच NASA अंतराळ संस्थेने TO1-4465  b या नवीन ग्रहाचा शोध लावला.
- मुंबईतील कर्नाक पुलाचे नाव बदलून सिंदूर करण्यात आले आहे.
- सुपरयुनायटेड रॅपिड आणि ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धा २०२५ मध्ये भारताच्या डी गुकेश ने तिसरे स्थान पटकावले आहे. (२०२५ चे विजेतेपद मॅग्नस कार्लसन यांनी जिंकले आहे.)





- अलिकडेच टायफून डॅनस नावाचे चक्रीवादळ तैवान देशात आले आहे.
- राष्ट्रीय शैक्षणिक सर्वेक्षणामध्ये (परख) महाराष्ट्राने देशात आठवे स्थान पटकावले आहे.( पंजाब राज्य प्रथम क्रमांकावर आहे.)
- इंडियन ओपन ॲथलेटिक्स स्पर्धा पुणे येथे होणार आहे.
- आईसीसी (ICC) कसोटी फलंदाजी क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर जो रूट आहे. (भारताच्या शुभमन गिल ने ६ व्या स्थानावर झेप घेतली आहे. )
- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 12 किल्ले गडकिल्ल्यांचा समावेश UNESCO च्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यात आला आहे. ( वारसा यादीत समाविष्ट करण्यात आलेला जिंजी किल्ला तमिळनाडू राज्यात आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत सध्या भारतातील 44 स्थळांचा समावेश आहे.)

---

- भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) देशातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे अंतराळ स्थानक गुजरात राज्यात उभारणार आहे.
- Apple चे नवीन CEO म्हणून सबीह खान यांची नियुक्ती करण्यात आली.
- जन सुरक्षा विधेयक मांडणारे महाराष्ट्र हे पाचवे राज्य ठरले आहे.
- कलादान प्रकल्प भारत आणि म्यानमार देशाची योजना आहे.

- मराठी फिल्मफेअर पुरस्कार २०२५ मध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपट - पाणी ठरला आहे.
- मराठी फिल्मफेअर पुरस्कार २०२५ मध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेता - महेश मांजरेकर.
- मराठी फिल्मफेअर पुरस्कार २०२५ मध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्री - प्राजक्ता माळी.



- रेल्वे संरक्षण दलाच्या (RPF) पहिल्या महिला महासंचालक म्हणून सोनाली मिश्रा यांची नियुक्ती करण्यात आली.
- २०२५ चा 'संयुक्त राष्ट्रां'चा आंतरराष्ट्रीय लोकसंख्या पुरस्कार वर्षा देशपांडे यांना देण्यात आला.
- भारताच्या पहिल्या स्वदेशी डायव्हिंग सपोर्ट जहाज INS निस्टारचे लोकार्पण विशाखापट्टणम या ठिकाणी करण्यात आले आहे.

- फिफा रँकिंगमध्ये अर्जेंटिना देशाचा फुटबॉल संघ प्रथम क्रमांकावर आहे.
- फिफा रँकिंगमध्ये भारतीय पुरुष फुटबॉल संघाची रँक १३३ वीआहे.
- नेमबाजी विश्वचषक स्पर्धा २०२७ भारत देशात होणार आहे.
- फ्रेंच ओपन २०२५ च्या पुरुष एकेरीचे विजेतेपद यानिक सिनर यांनी पटकावले.

---

- स्वच्छ शहरांच्या सर्वेक्षणानुसार अहमदाबाद शहर देशात पहिल्या क्रमांकावर आहे.( त्यानंतर भोपाळ आणि लखनौचा क्रमांक लागला, जरी इंदूर आणि सुरतसह मागील विजेत्यांना एका नवीन 'सुपर स्वच्छ लीग' श्रेणीत हलवण्यात आले जे देशव्यापी क्रमवारीतून बाहेर ठेवण्यात आले होते.)
- अमरनाथ यात्रेच्या सुरक्षेसाठी भारतीय लष्कराने “ऑपरेशन शिवा” ऑपरेशन सुरू केले.
- ५७ व्या आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र ऑलिम्पियाडमध्ये भारतीय विद्यार्थ्यांनी ४ पदके जिंकले आहेत.( ५७ व्या आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र ऑलिम्पियाडचे आयोजन दुबई येथे करण्यात आले होते.)
- PEN Pinter Prize २०२५ साठी लेखिका लीला अबौलेला सन्मानित करण्यात आले आहे
- भारतातील पहिले डिजिटल नोमॅड (भटके) गाव यात्केन बनले आहे. यात्केन हे गाव सिक्कीम राज्यात आहे.
- जून २०२५ महिन्यातील ICC प्लेयर ऑफ द मंथ पुरुष पुरस्कार एडन मार्कराम यांना जाहीर झाला आहे.
- १५ वी हॉकी इंडिया ज्युनिअर महिला राष्ट्रीय चॅम्पियनशिप २०२५ चे विजेतेपद झारखंड संघाने जिंकले आहे.
- थेट तेल उत्पादन करणारे भारतातील पहिले राज्य आसाम ठरणार आहे.
- महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील इस्लामपुरचे नाव बदलुन ईश्वरपूर करण्यात आले आहे.
- पशुधन आणि कुक्कुटपालनाला कृषी दर्जा देणारे भारतातील पहिले राज्य महाराष्ट्र ठरले आहे.
- भारतातील पहिला आदिवासी जीनोम सिक्वेन्सिंग प्रकल्प गुजरात राज्याने सुरू केला आहे.
- क्रिकेट खेळाडू आंद्रे रसेलने नुकतेच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली असून तो वेस्ट इंडिज देशाचा खेळाडू आहे.
- दीपिका सेहरावत या भारतीय महिला हॉकीपटूने पॉलीग्रास मॅजिक स्किल पुरस्कार जिंकला आहे.
- देशातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक लांबीचा तारांचा पुल कर्नाटक राज्या त शरावती नदीवर बांधण्यात आला आहे.



- नुकतेच भारताने पृथ्वी २ आणि अग्नी १ दोन बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांची यशस्वी चाचणी ओडिशातील चांदीपूर येथून घेतली.
- जगातील सर्वात महागडी महिला फुटबॉलपटू ओलिविया स्मिथ बनली आहे.
- ग्रीन हायड्रोजन समिट-२०२५ चे आयोजन आंध्र प्रदेश येथे करण्यात आले आहे.
- २०२५ चा राष्ट्रीय भू-स्थानिक अभ्यासक पुरस्कार INCOIS या संस्थेला मिळाला.
- भारताने नुकतेच बोलिव्हिया या देशाला गोवर आणि रुबेला लसीचे 3 लाख डोस पाठवले.
- रायगडच्या पायथ्याशी असलेले नीजामपुर या गावाचे नाव बदलुन रायगडवाडी करण्यात आले.
- नुकतेच भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे ते १४ वे उपराष्ट्रपती होते. (उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांच्या कडे आपल्या पदाचा राजीनामा सादर केला आहे.)

---

- तिसरा युनायटेड नेशन्स नेल्सन मंडेला पुरस्कार २०२५ केनेडी ओडेडे आणि ब्रेंडा रेनॉल्ड्स यांना प्रदान करण्यात आला.
- १०० जिल्ह्यांमध्ये शेतीला चालना देण्यासाठी मंत्रिमंडळाने पंतप्रधान धन-धान्य कृषी योजना २०२५ या योजनेला मंजुरी दिली आहे.
- ३३ देशांमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्यात भारत २४ व्या क्रमांकावर आहे.
- विदर्भातील पहिल्या एकात्मिक स्टील प्लांटचे उद्घाटन गडचिरोली येथे करण्यात आले.
- 'युनेस्को' या संयुक्त राष्ट्राच्या शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतीक संस्थामधून बाहेर पडण्याचे अमेरीका देशाने जाहीर केले आहे.
- नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या धर्तीवर राज्यात 'कृषी समृद्धी योजना' योजना राबविण्यात येणार आहे.( शाश्वत शेतीस प्रोत्साहनासाठी महाराष्ट्र राज्यात "कृषी समृद्धी योजना" योजना राबविण्यात येत आहे.22 जुलै 2025 रोजी महाराष्ट्र सरकारने महत्त्वाकांक्षी कृषी समृद्धी योजना सुरू केली, ही 25,000 कोटी रुपयांच्या खर्चाची योजना असून पुढील पाच वर्षांत राज्याच्या कृषी क्षेत्रात क्रांती घडवून आणण्याचे उद्दिष्ट आहे.)
- तामिळनाडू राज्य सरकारने अनामलाई व्याघ्र प्रकल्प येथे हॉर्नबिल संवर्धनासाठी भारतातील पहिले सेंटर ऑफ एक्सलन्स सुरू केले आहे.



- तिबेट पठाराच्या पूर्वेकडील काठावर, चीन देशाने जगातील सर्वात मोठे जलविद्युत धरण बांधण्यास सुरुवात केली आहे.
- नुकतेच ब्रिटन देशाने मतदानाचे वय १८ वरून १६ वर्षे केले आहे.
- नुकतेच पश्चिम घाटात ॲलोग्राफा एफ्युसोसोरेडिका या नवीन लायकेन प्रजातीचा शोध लागला आहे.
- देशातील पहिले स्वदेशी बनावटीचे डायव्हिंग सपोर्ट व्हेसल INS निस्तार आहे.
- भारताचे मिग-२१ हे लढाऊ विमान सप्टेंबर २०२५ मध्ये निवृत्त होत असून याची जागा मार्क १ ए विमानाने घेतली.

---

- मिसेस अर्थ इंटरनॅशनल किताब २०२५ विधू इशिका जिंकला आहे.
- यंदाचा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार २०२५ नितिन गडकरी यांना जाहीर झाला आहे.
- नासा आणि इस्रोची संयुक्त मोहीम "निसार" ३० जुलै रोजी प्रक्षेपित झाली.
- आसाम सरकारने २०२५ मध्ये दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रति लिटर ५ रुपये दूध अनुदान योजना सुरू केली आहे.
- FIDE महिला विश्वचषक ८८ वी - R06 या अंतिम फेरीत पोहोचणारी "पहिली भारतीय महिला" दिव्या देशमुख ही ठरली आहे ( रहिवासी नागपूर, महाराष्ट्र.)

> "19 वर्षांची दिव्या देशमुखने 28 जुलै रोजी जॉर्जिया देशातील बटुमी शहरात पार पडलेल्या महिला वर्ल्ड कप स्पर्धेच्या टाय-ब्रेकरमधील दुसऱ्या रॅपिड गेममध्ये अनुभवी कोनेरू हम्पीचा पराभव करत इतिहास रचला. यासह, दिव्या देशमुख वर्ल्ड कप जिंकणारी सर्वात तरुण भारतीय महिला बुद्धिबळपटू बनली आहे."

- नुकतेच भारताने "अपाचे" हे लढाऊ हेलिकॉप्टर अमेरिका देशाकडून खरेदी केले आहे.
- डॉ. चिंतामणराव देशमुख राष्ट्रीय पुरस्कार नितीन गडकरी यांना जाहीर झाला आहे.
- हेनले पासपोर्ट इंडेक्स २०२५ मध्ये भारत ७७ व्या स्थानावर आहे. (२०२४ मध्ये भारत ८५ व्या स्थानावर होता.) हेनले पासपोर्ट इंडेक्स २०२५ नुसार सिंगापूर देशाचा पासपोर्ट सर्वात शक्तिशाली आहे जो २२७ पैकी १९३ ठिकाणी व्हिसा-मुक्त प्रवेश देतो.
- जागतीक भूक निर्देशांक २०२४ मध्ये १२७ देशांत भारत १०५ व्या व्या स्थानावर आहे.
- शाहीन 3 क्षेपणास्त्र हे पाकिस्तान देशाचे आहे त्याची चाचणी नुकतीच अयशस्वी झाली.
- आरबीआय वित्तीय समावेशन निर्देशांक (आर्थिक वर्ष २५) ६७.० वर पोहोचला.

- ग्लोबल फायनान्स मॅगझिनने SBI बँकेला २०२५ मध्ये जगातील सर्वोत्तम ग्राहक बँक म्हणून घोषित केले.
- आशियाई विकास दृष्टिकोन २०२५ नुसार जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था भारत आहे.
- भारताचे सर्वाधिक काळ पंतप्रधान राहणारे दुसरे व्यक्ती नरेंद्र मोदी बनले आहेत.



- इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाच्या पहिल्या महिला कुलगुरू उमा कांजीलाल बनल्या आहेत.
- बाबला मेहता यांचे नुकतेच निधन झाले आहे त्यांची 'गोल्डन व्हॉईस ऑफ मुकेश' अशी ओळक होती.
- प्रा. सुलोचना माधव गाडगीळ यांचे नुकतेच निधन झाले आहे त्या हवामानशास्त्रज्ञ होत्या.
- भारत 2035 वर्षापर्यंत आपले स्वत:चे अवकाश स्थानक स्थापन करणार आहे.

---

- महाराष्ट्रातील पहिला काचेचा पूल सिंधुदुर्ग जिल्ह्यात नापने धबधब्यावर बांधण्यात आला.
- मॉर्निंग कन्सल्टने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार जगातील सर्वात लोकप्रिय नेते नरेंद्र मोदी ठरले आहेत.
- नुकतेच देशातील 17 खासदारांना संसदरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. (त्यामध्ये 7 महाराष्ट्रातील खासदारांचा समावेश आहे.)
- नॉर्थ अमेरिकन फिल्म असोसिएशनतर्फे जीवनगौरव पुरस्काराने अमोल पालेकर यांना सन्मानित करण्यात आले.
- गीतांजली श्री यांच्या "वन्स एलिफंट्स लिव्हड हियर" पुस्तकाला पेन ट्रान्सलेट्स पुरस्कार मिळाला आहे.
- पहलगाम हल्ल्यातील दोन दहशतवाद्यांना संपवण्यासाठी भारतीय लष्कराने नुकतेच "ऑपरेशन महादेव" राबवले.
- देशातील पहिली कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानावर आधारित अंगणवाडी नागपूर येथे ( वडधामना गावात ) सुरू करण्यात आली.
- 2025 पासून, भारत सरकार खत अनुदान देण्यासाठी डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर (DBT) प्रणाली वापरत आहे.
- नुकतेच महाराष्ट्र राज्यात मुख्यमंत्री पंचायतराज अभियान राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.
- भारतातील पहिला AI - रेडी क्लाउड संगणक जीओ पीसी रिलायन्स जिओ कंपनीने लॉन्च केला आहे.

- भारतीय सैन्याने अलिकडेच अरुणाचल प्रदेश राज्यातील पूर्व सियांग जिल्ह्यात ड्रोन प्रहार सराव आयोजित केला आहे.

- भारतीय लष्करातील माजी सैनिकांना त्यांचे पेन्शन मिळवणे सोपे व्हावे यासाठी संरक्षण मंत्रालयाने पेन्शन प्रशासन रक्षा प्रणाली (SPARSH) प्रणाली सुरू केली.
- नुकतेच भारतीय वंशाचे मेघनाथ देसाई यांचे निधन झाले आहे ते अर्थशास्त्रज्ञ होते.
- रेमोना एवेट परेरा या युवतीने 170 तास सलग भरतनाट्यम नृत्य करत गोल्डन बुक ऑफ वर्ल्ड रिकॉर्ड्स मध्ये नोंद केली आहे.
- मध्य प्रदेशातील जबलपूर शहरात भारतातील पहिल्या हिंदी माध्यमातील MBBS कॉलेजची स्थापना झाली आहे.
- जगातील सर्वोत्तम पर्यटन स्थळांमध्ये लंडन शहर पहिल्या क्रमांकावर आहे. (भारताचे जयपूर शहर पाचव्या क्रमांकावर आहे.)
- पाच वर्षांच्या अंतरानंतर भारताने चीन देशातील नागरिकांना पर्यटक व्हिजा देणे पुन्हा सुरू केले आहे.

## संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय वर्षांची यादी

संयुक्त राष्ट्रांनी यापूर्वी तयार केलेल्या आंतरराष्ट्रीय वर्षांची संख्या आणि प्रकारांबद्दल थोडक्यात माहिती घेऊया. खालील तक्ता तुम्हाला मागील संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय वर्षांबद्दल सांगेल जसे की - आंतरराष्ट्रीय भात वर्ष, आंतरराष्ट्रीय युवा वर्ष, आंतरराष्ट्रीय साक्षरता वर्ष, आंतरराष्ट्रीय अपंग वर्ष, आंतरराष्ट्रीय वन वर्ष, आंतरराष्ट्रीय प्रकाश वर्ष आणि इतर अनेक प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय वर्ष.

| वर्ष | स्पष्टीकरण |
|---|---|
| १९५९/६० | जागतिक निर्वासित वर्ष |
| १९६१ | आंतरराष्ट्रीय आरोग्य आणि वैद्यकीय संशोधन वर्ष |
| १९६५ | आंतरराष्ट्रीय सहकार्य वर्ष |
| १९६७ | आंतरराष्ट्रीय पर्यटन वर्ष |
| १९६८ | आंतरराष्ट्रीय मानवी हक्क वर्ष |
| १९७० | आंतरराष्ट्रीय शिक्षण वर्ष |
| १९७१ | वंशवाद आणि वांशिक पूर्वग्रह रोखण्यासाठी आंतरराष्ट्रीय कृती वर्ष |
| १९७४ | जागतिक लोकसंख्या वर्ष |

| | |
|---|---|
| १९७५ | आंतरराष्ट्रीय महिला वर्ष |
| १९७८-७९ | आंतरराष्ट्रीय रंगभेद विरोधी वर्ष |
| १९७९ | आंतरराष्ट्रीय बाल वर्ष |
| १९८१ | आंतरराष्ट्रीय अपंग वर्ष |
| १९८२ | दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या निर्बंधांसाठी आंतरराष्ट्रीय एकत्रीकरण वर्ष |
| १९८३ | जागतिक संप्रेषण वर्ष; संप्रेषण पायाभूत सुविधांचा विकास |
| १९८५ | आंतरराष्ट्रीय युवा वर्ष: सहभाग, विकास, शांतता संयुक्त राष्ट्रांचे वर्ष |
| १९८६ | आंतरराष्ट्रीय शांतता वर्ष |
| १९८७ | बेघरांसाठी आंतरराष्ट्रीय निवारा वर्ष |
| १९९० | आंतरराष्ट्रीय साक्षरता वर्ष |
| १९९२ | आंतरराष्ट्रीय अंतराळ वर्ष |
| १९९३ | जगातील आदिवासी लोकांसाठी आंतरराष्ट्रीय वर्ष |
| १९९४ | आंतरराष्ट्रीय क्रीडा वर्ष आणि ऑलिंपिक आदर्श |
| १९९४ | आंतरराष्ट्रीय कुटुंब वर्ष |
| १९९५ | दुसऱ्या महायुद्धातील बळींच्या स्मरणार्थ जागतिक लोक वर्ष आणि संयुक्त राष्ट्र सहिष्णुतेचे वर्ष |
| १९९६ | गरिबी निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय वर्ष |
| १९९८ | आंतरराष्ट्रीय महासागर वर्ष |
| १९९९ | आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती वर्ष |
| २००० | शांतीच्या संस्कृतीसाठी आंतरराष्ट्रीय वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय थँक्सगिव्हिंग वर्ष |
| २००१ | वंशवाद, वांशिक भेदभाव, परदेशांविषयीचा द्वेष आणि संबंधित असहिष्णुता विरुद्ध आंतरराष्ट्रीय आंदोलन वर्ष आणि आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक वर्ष<br>आणि संयुक्त राष्ट्रसंघ संस्कृतींमधील संवाद वर्ष |
| २००२ | आंतरराष्ट्रीय पर्यावरणीय पर्यटन वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय पर्वत वर्ष<br>आणि संयुक्त राष्ट्रसंघ सांस्कृतिक वारसा वर्ष |
| २००३ | आंतरराष्ट्रीय गोड्या पाण्याचे वर्ष<br>आणि किर्गिझ राज्यत्वाचे वर्ष |
| २००४ | आंतरराष्ट्रीय तांदूळ वर्ष<br>आणि गुलामगिरी विरुद्धच्या लढ्याचे आणि त्याच्या निर्मूलनाचे स्मरण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय वर्ष |
| २००५ | आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र वर्ष |

| | |
|---|---|
| | आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा आणि शारीरिक शिक्षण वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय सूक्ष्म कर्ज वर्ष |
| २००६ | आंतरराष्ट्रीय वाळवंट आणि वाळवंटीकरण वर्ष |
| २००७-२००८ | आंतरराष्ट्रीय ध्रुवीय वर्ष (WMO) |
| २००८ | आंतरराष्ट्रीय बटाट्याचे वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय स्वच्छता वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय भाषा वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय पृथ्वी वर्ष |
| २००९ | गोरिल्ला वर्ष [UNEP आणि UNESCO]<br>आणि आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय नैसर्गिक तंतू वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय सलोखा वर्ष |
| २०१० | आंतरराष्ट्रीय नाविक वर्ष<br>आणि संस्कृतींच्या पुनर्मिलनासाठी आंतरराष्ट्रीय वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय जैवविविधता वर्ष |
| २०११ | आफ्रिकन वंशाच्या लोकांसाठी आंतरराष्ट्रीय वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय वन वर्ष |
| २०१२ | सर्वांसाठी शाश्वत ऊर्जेचे आंतरराष्ट्रीय वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष |
| २०१३ | आंतरराष्ट्रीय क्विनोआ वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय जल सहकार्य वर्ष |
| २०१४ | आंतरराष्ट्रीय कुटुंब शेती वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय क्रिस्टलोग्राफी वर्ष<br>आणि लहान बेट विकसनशील राज्यांचे आंतरराष्ट्रीय वर्ष<br>आणि पॅलेस्टिनी लोकांसोबत एकतेचे आंतरराष्ट्रीय वर्ष |
| २०१५ | आंतरराष्ट्रीय माती वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय प्रकाश आणि प्रकाश-आधारित तंत्रज्ञान वर्ष |
| २०१६ | आंतरराष्ट्रीय डाळी वर्ष |
| २०१७ | विकासासाठी शाश्वत पर्यटनाचे आंतरराष्ट्रीय वर्ष |
| २०१९ | रासायनिक घटकांच्या आवर्त सारणीचे आंतरराष्ट्रीय वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय नियंत्रण वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय स्थानिक भाषा वर्ष |

| | |
|---|---|
| २०२० | आंतरराष्ट्रीय परिचारिका आणि सुईणी वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय वनस्पती आरोग्य वर्ष |
| २०२१ | बालकामगार निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय फळे आणि भाज्या वर्ष<br>आणि शाश्वत विकासासाठी सर्जनशील अर्थव्यवस्थेचे आंतरराष्ट्रीय वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय शांती आणि विश्वास वर्ष |
| २०२२ | आंतरराष्ट्रीय कारागीर मत्स्यपालन आणि जलसंवर्धन वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय काचेचे वर्ष<br>आणि शाश्वत विकासासाठी मूलभूत विज्ञानांचे आंतरराष्ट्रीय वर्ष<br>आणि आंतरराष्ट्रीय शाश्वत पर्वतीय विकास वर्ष |
| २०२३ | आंतरराष्ट्रीय बाजरीचे वर्ष आणि शांतीची हमी म्हणून आंतरराष्ट्रीय संवाद वर्ष |
| २०२४ | आंतरराष्ट्रीय कॅमिलिड्स वर्ष |
| २०२५ | आंतरराष्ट्रीय हिमनदी संवर्धन वर्ष |
| २०२६ | आंतरराष्ट्रीय रेंजलँड्स आणि पशुपालक वर्ष |

## जुलै महिना दिनविशेष

| | |
|---|---|
| **१ जुलै** | राष्ट्रीय डॉक्टर दिन (डॉ. बिधान चंद्र रॉय यांच्या सन्मानार्थ). |
| **11 जुलै** | जागतिक लोकसंख्या दिन. |
| **14 जुलै** | बॅस्टिल दिन (फ्रान्स). |
| **22 जुलै** | भारताच्या राष्ट्रीय ध्वजाचा स्वीकार. |
| **24 जुलै** | राष्ट्रीय थर्मल अभियंता दिन. |
| **26 जुलै** | कारगिल विजय दिवस. |
| **28 जुलै** | जागतिक संवर्धन दिन. |
| **31 जुलै** | राष्ट्रीय ऍव्होकाडो दिन. |








## यात तुम्हाला मिळणार... !!

Scan & pay >

sureshmaza@kotak

Suresh narayan kumbhar

1. कोणत्याही एका विषयाची नोट्स किंमत = ४९ रुपये /-
2. कोणताही दोन विषयाच्या नोट्स = ९० रुपये /-
3. सर्व नोट्स एकत्र घेतल्यास = १९९ रुपये /-

**मोफत [ चालू घडामोडी मासीक चालू महिना ]**

**( पैसे पाठवल्या नंतर +917720039454 या नंबर वर स्क्रीनशॉट पाठवा )**

www.mpscshort.in

( Teligram चेनल जॉइन करा आणि मिळवा सर्व स्पर्धा परीक्षा अपडेट मोफत @mpscshorts )

© All right reserved @mpscshorts – 2024 ( education perpose only don't violate coppyright Act )

**#Udyam registation number - MH-25-0036092**

Contact@mpscshort.in / +917720039454













